## व्दितीय श्रेणी बाष्पक परिचारक परीक्षेकरिता आवश्यक अर्हता व अनुभव.

१ व्दितीय श्रेणी बाष्पक परिचारक अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

२ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र व गुणतक्त्याची स्वयं सांक्षाकित प्रत जोडण्यात यावी.

३ बाष्पके अधिनियम १९२३ प्रमाणे नोंदणीकृत असलेल्या बाष्पकावर आगवाला किंवा ऑपरेटर किंवा पंपमन किंवा वॉटरमन किंवा सहाय्यक आगवाला किंवा सहाय्यक ऑपरेटर या पदावर, बाष्पक परिचारकाच्या हाताखाली काम करण्याचा कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असावा.

**किंवा**

४ जोडारी (फिटर) म्हणून बाष्पक निर्मात्याकडे, बाष्पक उभारण्याकरिता, बाष्पक चालविण्याकरिता किंवा दुरुस्तीकरिता कमीत कमी ३ वर्ष काम केलेले असावे व यापैकी सहाय्यक आगवाला म्हणून किमान १ वर्ष सेवेचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**किंवा**

५ आय.टी.आय. प्रमाणपत्र असलेल्या व भारतीय बाष्पके विनियम १९५० प्रमाणे प्रकरण-१४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तयार करण्यात आलेले स्मॉल इंडस्ट्रीयल बॉयलरवर (SIB) काम करण्याचा २ वर्षाचा अनुभव अनिवार्य आहे. (स्मॉल इंडस्ट्रीयल बॉयलर (SIB) म्हणजे ज्याची पाणी धारण क्षमता ५०० लिटर आहे व वाफेची दाब क्षमता ७ kg/cm२ असे शेल टाईप बॉयलर किंवा ज्याची पाणी धारण करण्याची क्षमता १५० लिटर आहे व वाफेचा दाब १२ kg/cm२ असे वॉटर टयुब बॉयलर,)

## उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना.

१ बाष्पक परिचारक परीक्षेचे शुल्क रु.३००/- ई-पेमेंटने ऑन लाईन पध्दतीने (www.gras.mahakosh.gov.in) जमा करावे व मूळ चलनाची प्रत अर्जा सोबत जोडावी अथवा मुख्य कार्यालयात अथवा विभागीय कार्यालयात परीक्षा शुल्क रोखीने जमा करुन त्याची मुळ पावती अर्जा सोबत जोडावी.

२ ज्या प्रमाणपत्रात (दाखल्यात) उमेदवाराची जन्मतारीख, त्याचे जन्मस्थळ व तो भारताचा नागरीक आहे असा उल्लेख केलेले तालुका, जिल्हा, अप्पर जिल्हा दंडाधिकारी, अप्पर महानगर दंडाधिकारी मुंबई यांनी दिलेले भारतीय नागरीकत्वाचे प्रमाणपत्राची स्वयं साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे.

३ शैक्षणिक अर्हता, वय व नागरीकत्व इत्यादी प्रमाणपत्रांच्या प्रती स्वयं साक्षांकित केलेल्या असाव्यात. स्वयं साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र **(Self Declaration)** प्रपत्र-ब, अर्जासोबत जोडण्यात यावे, नसल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

४ अनुभवाचे (सेवा) प्रमाणपत्र या अर्जासोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणेच असावे व यातील सर्व तपशील हा आपण ज्या विभागात कार्यरत आहात, तेथील बाष्पकांचे निरीक्षण करणा-या विभागीय अधिका-याकडून पडताळणी केलेले असावे व त्यावर त्यांची सही व शिक्का असावा. असे सेवा प्रमाणपत्र त्याच्या मूळ प्रतीसह आणि छायांकित प्रतीसह अर्जास जोडलेले असावे, नसल्यास आपला अर्ज नाकारण्यात येईल.

५ उमेदवाराने स्वतःचे अलिकडील तीन रंगीत छायाचित्रे, ज्यांची छायाचित्रातील मागील बाजू पांढरी असावी व त्याचा आकार हा ६५ मी.मी. उभा X ५० मी.मी. आडवा असा असावा व यापैकी एक रंगीत छायाचित्र अर्जावर दर्शविण्यात आलेल्या चौकटीत चिकटवून त्यावर स्वतःची स्वाक्षरी करण्यात यावी. उर्वरित दोन छायाचित्रांच्या मागील बाजूस उमेदवाराने स्वतःचे नांव व स्वाक्षरी करुन ती बंद लिफाफामध्ये घालून अर्जासोबत जोडावे.

६ अर्जासोबत सादर केलेल्या सर्व स्वयं साक्षांकित प्रमाणपत्रांची मूळ प्रमाणपत्रे ही मूलाखतीच्या वेळी सादर करणे अनिवार्य असेल.

७ अर्जासोबत शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी किंवा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी (Registered Medical Practitioner) यांनी दिलेले शारीरिक स्वास्थ्य प्रमाणपत्र जोडण्यात यावे. नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी यांनी दिलेल्या शारीरिक स्वास्थ्य प्रमाणपत्रावर त्यांचा वैद्यकीय नोंदणी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

८ अर्ज पाठविण्याचा पत्ता :- संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, ७वा मजला, प्लॉट क्रं.सी-२०, ब्लॉक- ई, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्रमांक -०२२-२६५७१२०१/२६५७१३०४

९ पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र प्राप्त झाल्यानंतर, सदर प्रवेशपत्रावर अर्जासोबत जोडण्यात आलेल्या छायाचित्राप्रमाणेच स्वतःचे छायाचित्र चिकटवावे व त्यावर आपण ज्या कंपनीत सध्या कार्यरत आहात त्या कंपनीने प्राधिकृत केलेल्या अधिका-याची सही व शिक्का घेण्यात यावा. तसेच पात्रता यादीत नांव असलेल्या पात्र उमेदवारास विहित मुदतीत प्रवेश पत्र मिळाले नाही, अशांनी परीक्षेचे वेळी आपण ज्या कंपनीत कामास आहात, तेथील त्यांचे स्वतःचे छायाचित्र असेलेले आस्थापनाचे ओळखपत्र सोबत घेवून यावे.

उप संचालक, बाष्पके आणि सचिव,
परीक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.